# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

## दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६५

**<u>५७ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (IFFI) गोवा अंतर्गत आयोजित NFDC Waves Film Bazaar -२०२६ मध्ये सहभागाकरिता अटी व शर्ती: -</u>**

१. अर्ज / प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी दिनांक दि.२५.०८.२०२६ ते दि. ०८.०९.२०२६ असा आहे.

२. निर्माते / निर्मिती संस्थांनी त्यांचे प्रस्ताव gfffm2026@gmail.com या ई-मेल वर सादर करावेत.

३. दिनांक ०१.०८.२०२५ ते ३१.०७.२०२६ या कालावधीत भारतीय सेन्सॉर बोर्डामार्फत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या मराठी चित्रपटांचा (**फिचर फिल्म**) समावेश असेल.

४. इतर भाषेतील रिमेक किंवा डब असलेल्या मराठी चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

५. ज्या चित्रपटांची कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२६ करिता महामंडळामार्फत निवड करण्यात आली होती अशा चित्रपटांना सहभागी होता येणार नाही.

६. महामंडळाकडे प्राप्त होणाऱ्या चित्रपटांच्या प्रस्तावामधून परिक्षण समितीने निवड केलेल्या चित्रपटांची निवड करण्यात येईल.

७. चित्रपटाची निवड भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव **(IFFI)** गोवा अंतर्गत आयोजित **NFDC Waves Film Bazaar-2026** करिता झाल्यास वेळोवेळी चित्रपटाची डिसीपी व केडीएम आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्याची जबाबदारी निर्माते / निर्मिती संस्थेची राहील.

८. अधिक माहितीसाठी श्री. मंगेश राऊळ, सांस्कृतिक समन्वयक भ्रमणध्वनी क्र. ९८१९६३८२२१ आणि श्री. पंकज चव्हाण, माध्यम आणि जनसंपर्क व्यवस्थापक ९७०२२७०८२१, श्री. विष्णु गायकवाड, सहाय्यक ९८९०६६८९१६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

९. निवड होणाऱ्या चित्रपटाच्या एका प्रतिनिधीचे रजिस्ट्रेशन, वास्तव्य व्यवस्था, जाणे-येणे प्रवास खर्च इत्यादी महामंडळामार्फत करण्यात येईल.

१०. कोणत्याही वेळी जाहिरात रद्द करण्याचे अथवा जाहिरातीमध्ये बदल करण्याचे सर्वाधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.